**पंतप्रधानांची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सोबत दूरध्वनीद्वारे चर्चा, द्विपक्षीय सहकार्य आणि पश्चिम आशिया तसेच स्ट्रेट ऑफ होर्मुझ मुद्द्यांवर चर्चा**

15 एप्रिल 2026

भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांमध्ये दूरध्वनी संवाद झाला.

2. उभय नेत्यांनी विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्यामध्ये प्राप्त झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला आणि सर्व क्षेत्रांमध्ये सर्वसमावेशक जागतिक धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्याची वचनबद्धता अधोरेखित केली.

3. त्यांनी पश्चिम आशियातील परिस्थितीवर देखील चर्चा केली आणि होर्मुझची सामुद्रधुनी खुली आणि सुरक्षित ठेवण्याच्या महत्त्वावर भर दिला.

4. श्री मोदी यांनी 'एक्स' वर लिहिले;

"माझे मित्र डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत दूरध्वनीद्वारे चर्चा झाली. आम्ही विविध क्षेत्रांमध्ये आमच्या द्विपक्षीय सहकार्यात झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला. आम्ही सर्व क्षेत्रांमध्ये आमची सर्वसमावेशक जागतिक धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आम्ही पश्चिम आशियातील परिस्थितीवरही चर्चा केली आणि होर्मुझ सामुद्रधुनी खुली आणि सुरक्षित ठेवण्याबाबत विचारविनिमय केला

**नवी दिल्ली**

15 एप्रिल 2026